# स्नेहबंध

मराठी भाषिक मंडळ, टोरांटो इन्क.
Marathi Bhashik Mandal, Toronto Inc.

वर्ष २२ वे अंक तिसरा    संपादन : ज्योत्स्ना ओगले    ३० जून १९९३ आषाढी एकादशी

## सप्रेम नमस्कार ;

१९९३ साल भराभर पुढे पळते आहे. बघता-बघता तुमच्या भेटीला स्नेहबंध येतो आहे.

सोनेरी उन्हं... हिरवी गर्द पर्णराजी... रंगीबेरंगी फुले.. अंगणात वाढणारा भाजीपाला... ह्या सर्वांनी डोळे सुखावले असणार.

ह्या जुलैच्या सुरवातीला आपण सर्वचजण बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सहाव्या अधिवेशनाला गेलेलो नाहीत. पण तेथे जमलेल्या मंडळींच्या मनामध्ये अधिवेशनाची यशस्विता, पाच हजारांच्या वर संख्येने जमलेल्या मराठी जनसमुहाने आणलेली उभारी, अमेरिकेच्या राजधानीच्या धावत्या दर्शनाचा अनुभव... ह्या सर्वांच्या विचाराने मनात एक निर्मळ आनंदाचे मोरपीस जपत असणार.

पण यंदाच्या वर्षी अशाच आनंदाचे एक आणखी मोरपीस आपल्या सर्वांना जपून ठेवायचे आहे. पुढील अनेक वर्षांसाठी! यंदा ऑक्टोबरात साजरा होणारा आपल्या **मराठी भाषिक मंडळाचा** रौप्यमहोत्सव. आपण सर्वांनी हा ठेवा आपला मानला आहे. सामावलो असलो तरी आपले म्हणून वेगळे-पण टिकवले आहे. त्याची खूण म्हणजेच मंडळाचा **रौप्यमहोत्सव**! सूत्रबद्ध आखणी व परिश्रमाने हा रौप्यमहोत्सव यशस्वी होईलच. पण आपण सर्वांनी त्याचे स्वागत '**घरचेच कार्य**' समजून करायला हवे. समरसून त्यात भाग घ्यायला हवा.

तुम्हा सर्वांची उन्हाळ्याची सुट्टी (समर) चांगली जावो. विविध परीक्षांमध्ये गुणवत्तेने उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थीवर्गाचे मनःपूर्वक अभिनंदन!

आपल्या सर्वांची भेट आता सहलीला आणि गणेश-उत्सवाला. पण पुढच्या स्नेहबंधाची गाठ मात्र आता ऑक्टोबरात.

**ज्योत्स्ना ओगले**

(संपादन सहाय्याबद्दल सौ. नीता टिळक व सौ. दुर्गा पाच्छापूरकर यांचे विशेष आभार!)

## वासंतिक कार्यक्रमाचा अहवाल :

२४ एप्रिल रोजी मंडळाचा वासंतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा झाला. हा प्रथेनुसार वर्षाचा पहिला मोठा कार्यक्रम असतो आणि त्याला बहुसंख्येने हजर होऊन मराठी मंडळी हिवाळ्याची आलेली मरगळ घालवतात. यंदा 'सुगम संगीताचे बादशाहा' अशी ओळख करून दिलेले अरूण दाते हे एक प्रमुख आकर्षण होते.

काही अपरिहार्य कारणाने श्रीसत्यनारायणाची पूजा जरी काहीशी उशीरा सुरू होण्याचे गालबोट लागले तरीही पुढे मात्र अत्यंत सुसूत्रपणे कार्यक्रम चालू राहून अगदी वेळेत संपविण्याचे श्रेय नव्या कार्यकारिणीने मिळविले. पूजेचे पौरोहित्य, अनुप ओगले ह्या युवकाने पुण्याच्या ज्ञानप्रबोधिनीने प्रचलित केलेल्या पद्धतीने करून मंडळाच्या प्रथेमध्ये एक नवी अभिमानास्पद भर पाडली. पूजा, आरत्या व दर्शन सोहोळ्यानंतर उपस्थितांनी कॅफेटेरियात जाऊन प्रसाद व अल्पोपहाराचा आस्वाद घेतला. दक्ष स्वयंसेवक-वर्गाने शिस्तबद्धपणे ह्या कार्यक्रमाचे संघटन केल्याने अजिबात गोंधळ न होता मोठ्या मजेत पोटपूजा पार पडली.

त्यानंतर होती सुगम संगीताची मेजवानी! प्रारंभी डिट्रॉइटच्या सुरेल गायिका सौ. मृणालिनी अर्काटकर ह्यांनी काही लोकप्रिय भावगीते मोठ्या ताकदीने सादर करून श्रोतृ-वर्गाला मंत्रमुग्ध केले. मग रंगमंचावर पदार्पण केले ते **अरूण दाते** ह्यांनी! अतिशय आकर्षक व खेळकर शैलीने प्रत्येक गीताची ओळख करून देऊन, साथीदारांना अत्यंत सन्मानपूर्वक दाद देत अरूण दात्यांनी कार्यक्रम रंगविला खरा, परंतू त्यांच्या गाजलेल्या जुन्या गीतांमध्ये श्रोते जेवढे रंगले तेवढा प्रतिसाद नव्या गीतांना मिळाला नाही. जुन्या-हळव्या आठवणी जपणाऱ्या, वर्षानुवर्षे भारतापासून दूर राहिलेल्या श्रोत्यांची ही प्रतिक्रियाही अपेक्षित होती.

मराठी मंडळांकडून मिळणाऱ्या कमी (?) बिदागीचा उल्लेख एकदा करून श्रोत्यांचा हशा मिळविल्यानंतर तो मोह आवरण्याची सूचकता मात्र अरूण दात्यांसारख्या ज्येष्ठ कलावंताने पाळायला हवी होती. परंतू वारंवार उल्लेख केला गेल्याने प्रेक्षक अस्वस्थ झाले. ज्या प्रेमाने आणि परिश्रमाने भारतातून इथे आलेल्या मराठी कलावंतांची इथल्या

पृष्ठ ११ वर पहा

Royal **Kashmir**

- ***Fine Indian Dining***
- ***Take-Out (10% Discount)***
- ***Catering***
- ***Free Dinner Parking***

**AMIT KULKARNI**
*President*

**SALIL RANADIVE**
*Partner*

**Royal Kashmir Restaurant**
2291 Yonge St. (at Eglinton) • 322-8182

**$1 DOLLAR OFF**
20 Item Luncheon Buffet
*Regular $7.95*
* VALUE COUPON *

**Royal Kashmir Restaurant**
2291 Yonge St. (at Eglinton) • 322-8182

**One Free Entrée**
of equal or lesser value
with purchase of an entrée
at the regular price.
* VALUE COUPON *

**2291 Yonge Street (at Eglinton) • 322-8182**

# वार्षिक सहल

**तारीख २४ जुलै १९९३**

**दुपारी १ ते रात्री ८.**

२४ जुलैरोजी भरपूर पावसाची शक्यता असेल तर.
ता. ३१ जुलै रोजी त्याच वेळी, त्याच ठिकाणी.
सहलीचा कार्यक्रम होईल याची सर्व सभासदांनी
कृपया नोंद घ्यावी.

**WHERE ?**

ROWNTREE MILLS PARK
FIRE PIT #2
NORTH WEST OF

FINCH ✕ ISLINGTON




मंडळातर्फे सर्व वयोगटांसाठी भरपूर खेळ-स्पर्धा (बक्षिसांसहित) याशिवाय थोडेसे FUN-FAIR. फक्त $00^{25}$ डॉलर्स मध्ये आपले कौशल्यपणाला लावा, व आपल्या आवडीची वस्तु बक्षिस म्हणून मिळवा. या पासून होणारा फायदा मंडळाच्या विधायक कार्यासाठी वापरला जाईल. कोणाला स्वतःच्या वैशिष्ट्यपूर्ण खेळ गंमत म्हणून ठेवायचा असेल तर संयोजकांशी संपर्क साधावा.

उपहारासाठी मंडळातर्फे चमचमीत भेळ व थंडगार कलिंगड, मक्याचे कणीस, लहान मुलांसाठी कोळशाच्या शेगडीवर भाजलेले हॉट-डॉगज् व शीतपेये.

भरपूर संख्येने हजर राहून एकमेकांचा आनंद द्विगुणीत करा.

संयोजन — नंदकुमार ठकार - 452-1992.
— नितीन खांडेकर - 940-0105.
— मोना पत्की — 293-6383.

# वार्ताविहार ~
## (टोरांटो व आसपासचा भाग)



**सन्मान**

जुलै ५ ते १०, १९९३ ह्या दरम्यान युनेस्कोतर्फे पॅरिस-फ्रान्स येथे भरणाऱ्या 'INTERNATIONAL FORUM FOR PROJECT 2000+' मध्ये भाग घेण्यासाठी मंडळाचे एक जुने सभासद, सेंट कॅथरिन्सचे शिक्षणतज्ञ सेवानिवृत्त शिक्षक डॉ. एकनाथ मराठे यांना नुकतेच आमंत्रण आले आहे. ह्या सन्मानाबद्दल मराठी भाषिक मंडळातर्फे डॉ. मराठे यांचे हार्दिक अभिनंदन!

या कॉन्फरन्समध्ये वैज्ञानिक आणि तांत्रिक शिक्षण-साक्षरता, प्रसार आणि प्रगती या विषयांवर चर्चा आयोजित केल्या आहेत. इतर अनेक देशांमधील शैक्षणिक क्षेत्रातल्या सुमारे २५० प्रतिनिधींना आमंत्रणे गेली आहेत. डॉ. मराठे कॅनडाचे प्रतिनिधीत्व करणार आहेत.

"सुखास्ते पन्थानः सन्तु!"

**गुरुचे चेले!**

श्री. नरेंद्र दातार साभिमान सादर करीत आहेत, त्यांच्या **शिष्यवर्गाच्या** सुगम संगीताचा एक बहारदार कार्यक्रम!

**स्थळ :** यॉर्कवुड्स लायब्ररी (ON FINCH AVE W. BTWN KEELE & JANE) NORTH YORK, ONT

**वेळ :** संध्याकाळी ५ ते ७॥

**तारीख :** २५ जुलै १९९३ रविवारी

**प्रवेशमूल्य :** प्रौढ — $ ५.०० प्रत्येकी
१२ वर्षांखालील मुलांना प्रवेशमूल्य नाही.

**संपर्कासाठी :** नरेंद्र दातार- 287-8101

**सहस्रावर्तन**

श्री. विश्वनाथ व सौ. उमा कुलकर्णी यांचे निवासस्थानी ४ सप्टेंबर १९९३ रोजी सकाळी १० वाजता **श्रीगणपतीअथर्वशीर्षाचे सहस्रावर्तन** होणार आहे. ज्या बंधुभगिनींना ह्यामध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नांवे १५ ऑगस्टपर्यंत श्री. व सौ. कुलकर्णी यांना द्यावीत.

**अधिक माहितीसाठी :** 823-7992

## वनिता सहाय्यक समिती:

२७ मार्च रोजी सायंकाळी डॉ. सौ. कुमुदताई देशपांड्यांनी बोलावले महिलांना जागरणाला... अहो! एक नाही, दोन नाही चांगल्या पंचावन्न जणी जमल्या! चिवडा, समोश्यांच्या मदतीने गप्पांना चढला जोर. सत्रवार-कुडते, साड्या-दागिने, नवरे-मुले-तब्येती सर्वांवर चर्चा रंगली. जेवायचा बेतही खासच होता. पुरणपोळी, मसालेभात, रस्सा, चटणी, कोशिंबीर! आणि मग भरल्या पोटी सुपारी चघळत झाली करमणुकीला सुरवात!.... परस्परांचा परिचय, दुर्गाताईंचे कथावाचन, अनु अंबुर्लेचे एकटीचे अन् मग साथीदारांसह मुक्तनृत्य झाले, प्रवीणाची कथा झाली आणि हास्याची कारंजी उडवून गेली... मग काहीजणींना लागले घरी जायचे वेध. जाता-जाता उरल्या बाराजणी! मग पुन्हा गाण्यांची उजळणी, गप्पाष्टकं, चहा-कॉफीचे कप हातात आणि जोडीला मराठी सिनेमा.

उजाडल्यानंतर चहा पिऊन जागरणाचे सूप वाजले. खमंग चिवड्याबद्दल सिता ठकार, चवदार जेवणाबद्दल प्रवीणा काळे आणि सुगरण पुरणपोळीबद्दल चित्रा कुलकर्णी या तिघींचे 'भरल्या पोटीचे' आभार! जागरणाला जागा देऊन मजा करायची संधी दिल्याबद्दल कुमुदताईंचे ऋणी आहोत... आणि हो! उत्साहाने हजर राहिलेल्या सर्व भगिनींशिवाय जागरण रंगलं असतं का? त्यांनाही धन्यवाद!

*************************************

## संगीत संमेलन:

सौ. सरिता कुकडे आयोजित चतुर्थ संगीत संमेलन १५ मे रोजी मोठ्या धामधुमीत साजरे झाले. कलाकारांनी सादर केलेले संगीत, विविधांगानी समृद्ध व श्रवणीय होते.

भावगीतांनी मनाची तार छेडली... सिनेसंगीताने जुने दिवस आठवले... वाद्यवृंदाने नादब्रह्म निर्मिले... लावणीचा खटका मनाला रुचला... भजनांनी दाखविली भक्तिमार्गाची वाट... नाट्यसंगीत, गझल, सतारीवरील रागविलास सगळेच मनाला सुखावून गेले.

ह्या साऱ्या संगीत आविष्काराला सुरेल पेटी, दमदार तबला व इतर साथ पण केली सिद्धहस्त साथीदारांनी! कार्यक्रमाचे नेटके व रसपूर्ण निवेदन केले सौ. मंगला जुन्नरकर यांनी.

सादरकर्त्या, कलाकार, साथीदार व निवेदिका ह्या साऱ्यांचे मनःपूर्वक आभार! प्रारंभ केलेला नाविन्यपूर्ण उपक्रम सातत्याने करण्यात टोरांटोकर नेहमीच आघाडीवर असतात. दरवर्षी अधिकाधिक उत्साहाने साजरा होणारा संगीतमहोत्सव हे त्याचे खास उदाहरण!

## *IN APPRECIATION*

The Ministry of Agriculture & Food has donated a few copies of WordPerfect 5.0 software to the Marathi Bhashik Mandal; included are the software disks, reference manuals and installation instructions. The donation was made with the understanding that they would not be sold for a profit.

The Marathi Bhashik Mandal of Toronto appreciates greatly the donation and wishes to express sincere thanks to the Ministry.

(Anand Manohar was instrumental in acquiring this donation for the Mandal).


**ONE HOUR MOTOPHOTO™**

**FOR ALL YOUR**

***• PHOTOFINISHING NEEDS •***
***• PASSPORT PHOTOS •***
***• FAMILY PORTRAITS •***
***• CAMERAS •***
***• REPAIRS •***
***ETC.***

**CALL ON**
**SHIREESH OR MEENA**
**CHIPLUNKAR**
**(416) 609-3173 (Res.)**

**80 Thickson Road, South (South of Dundas on Thickson)**
**Whitby, Ontario L1N 7L1**
**Phone: (416) 430-6764**





Refinement, elegance, thoughtful hospitality and fine dining
The creation of a cuisine touched by a rare distinction
A name that sets standards that others
are measured against

**THE Moghul**

**"INDIAN CURRY HOUSE"**
**BECAUSE YOU DESERVE THE BEST THAT INDIAN CUISINE HAS TO OFFER**

**MOGHUL ROOM**
563 Bloor St. West
Toronto, Ontario
535-3315 (Bloor & Bathurst)

**MOGHUL DOWNTOWN**
33 Elm Street
Toronto, Ontario
597-0522 (Bay & Elm)

**MOGHUL CLUB**
415 Hood Road
Markham, Ontario
475-5870 (Warden & Steeles)

(Luncheon Buffet — Moghul Downtown · Moghul Club)

**COMPLETE BANQUET FACILITIES FOR WEDDINGS & SOCIAL FUNCTIONS**
**FROM 20 TO 500 PEOPLE**
**HOME CATERING**

## MARATHI BHASHIK MANDAL TORONTO, INC., Marathi Youth Camp Info.

All interested parties please read the following information.

**DATE & TIME:**
Friday August 13, 1993 6:30 pm arrival sharp to
Sunday August 15, 1993 3:00 pm departure sharp

**LOCATION:**
Woodland Trails Camp-Aurora, Ontario
(Approximately one hour NE of downtown Toronto)

**CAMPERS'AGE:**
Born on or between January 1, 1975 and December 31, 1980.

**SPACE:**
Spots are limited, so apply ASAP.

**DEADLINE:**
All camp applications must be in by JULY 15, 1992.

**COST:**
A fee of $45 (Canadian) per individual will provide use of camp and facilities, meals from Friday evening through Sunday afternoon including snacks, accessories for planned activities and camp utensils. If you need to cancel your attendance, only 50% of your fee will be refunded if you do so before July 29, 1993. After that no money will be refunded.

THIS IS REAL CAMPING!!
Woodland Trails Camp's 275 acres is a natural setting of beautifully wooded forests, untamed animals such as deer, raccoons and porcupines, and fresh open-air fields. Sleeping facilities include 2 lodges. Lodges contain bunk beds with foam mattresses, sinks, washrooms (indoor), and a small kitchen. Meals will generally be served in one of the two lodges. Other points of interest are a 25-metre pool with change rooms and showers, an obstacle course, and a campfire pit. SMOKING AND ALCOHOL IS PROHIBITED ON THE CAMP GROUNDS AND WILL BE STRICTLY ENFORCED BY THE CAMP RANGER. You will receive more detailed information regarding the Youth Camp (ie. camp maps, list of "what to bring", etc...) once we have received your completed application and cheque for full fee. REMEMBER, THE DEADLINE IS JULY 15, 1992!!!

FOR ALL INDIVIDUALS INTERESTED IN BECOMING CAMP COUNSELLORS:
All of the above holds true with only the following changes:

**COUNSELLORS'AGE:** Born before January 1, 1975.
**RESPONSIBILITIES:** Assisting with camp activities.

* **The number of counsellors this year is limited**, so if you are interested please contact: Mr. Nitin Khandekar at (416) 940-0105, IMMEDIATELY. Applications and cheques for counsellors must also be received by July 15, 1992.

**MANDATORY MEETING:** Sunday July 18, 1993 at 10:00 am at Oriole Community Centre, North York. Phone (416) 496-0922.

# २५

★ १९६८ ★ १९९३

## कॅनडा आगमनाची 'पंचविशी'

'स्नेहबंधां'च्या १९९३ सालच्या प्रथम अंकात, "ह्या रौप्यमहोत्सवी वर्षात कोणाला टोरांटोला येऊन २५ वर्षे पूर्ण झाली असल्यास कळवा" असे आवर्जून म्हटले होते. आमच्या हाती खालील नांवे आली आहेत.

- श्री. व सौ. शरद व लीना घाणेकर
- श्री. व सौ. आनंद व राजश्री मनोहर
- सौ. पुष्पा वागळे-रे
- श्री. व सौ. शरच्चंद्र व विजया कावळे
- श्री. व सौ. प्रमोद व कुंदा साठे
- सौ. छाया वसंत कुलकर्णी.

ह्यांच्याबरोबरच यंदा टोरांटो वास्तव्यास २५ वर्षे पूर्ण झालेल्या सर्वांचेच हार्दिक अभिनंदन!



## विवाह रौप्यमहोत्सव

खालील तीन दांपत्यांच्या विवाहाला यंदा २५ वर्षे पूर्ण झाल्याचे वृत्त हाती आले आहे. रुपेरी अभिनंदन!

- श्री. आनंद व सौ. राजश्री मनोहर — २८ डिसेंबर १९९२
- श्री. आत्माराम व सौ. मधु चौधरी — ८ मे १९९३
- श्री. मनोहर व सौ. छाया चौधरी — १६ मे १९९३

ह्याव्यतिरिक्त गेल्या सहा महिन्यात जर कोणाचे विवाह रौप्यमहोत्सव साजरे झाले असतील तर त्या सर्व दांपत्यांचेही रुपेरी अभिनंदन!

MARATHI BHASHIK MANDAL, TORONTO (INC)

BALANCE SHEET AS AT DECEMBER 31, 1992

| | 1992 | 1991 |
|---|---|---|
| **ASSETS** | | |
| CASH IN BANK | 1,570.74 | 369.74 |
| INVESTMENT IN MONEY MARKET FUND | 0.00 | 10,549.49 |
| INVESTMENT IN MORTGAGE FUND | 20,120.81 | 18,849.65 |
| INVESTMENT IN BOND FUND | 29,761.94 | 19,430.89 |
| INVESTMENT IN G.I.C. | 3,500.00 | 0.00 |
| ACCRUED INTEREST | 38.96 | 0.00 |
| BOOK INVENTORY | 212.50 | 212.50 |
| PREPAID EXPENSES | 0.00 | 355.03 |
| SUNDRY RECEIVABLES | 120.00 | 816.48 |
| FIXED ASSETS (NET) | 604.76 | 0.00 |
| FUNDS WITH SILVER JUBILEE COMM. | 7,877.35 | 0.00 |
| TOTAL | 63,807.06 | 50,583.78 |
| **LIABILITIES AND RESERVES** | | |
| ACCOUNTS PAYABLE | 0.00 | 0.00 |
| SCHOOL RESERVE | 3,474.82 | 3,654.82 |
| STUDENT ACHIEVEMENTS RESERVE | 1,012.90 | 862.90 |
| MEMBERSHIP FEES FOR 1993 | 390.00 | 0.00 |
| SILVER JUBILEE RESERVE | 7,877.35 | 0.00 |
| | 12,755.07 | 4,517.72 |
| **GENERAL RESERVE** | | |
| BEGINNING BALANCE | 46,066.06 | 42,015.07 |
| ADDITIONS DURING THE YEAR | 13,063.28 | 4,050.99 |
| TRANSFER TO SILVER JUBILEE RESERVE | (7,877.35) | 0.00 |
| TRANSFER TO STUDENT ACH. RESERVE | (200.00) | 0.00 |
| | 51,051.99 | 46,066.06 |
| TOTAL | 63,807.06 | 50,583.78 |

TORONTO
JUNE 18, 1993

PRESIDENT

TREASURER

AUDITOR

## संगीत विभाग

मराठी भाषिक मंडळातील बरेच सदस्य होतकरू गायक-वादक आहेत हे सत्य वार्षिक संगीत-संध्याकाळ व युवक-संध्याकाळ या कार्यक्रमातून आता बाहेर आले आहे. कलाकार व प्रेक्षक याना त्यातून आनंद होतो. त्या आनंदात भर घालण्यासाठी संगीत विभागाची आखणी आहे. कलाकाराची कला व श्रोत्यांची रसिकता वाढीस लागावी हा हेतू! त्यासाठी खाली दिलेल्या काही योजना आहेत.

१. मासिक बैठक - या बैठकीत मुख्यतः गायक व वादक आपण तयारी केलेली नवीन गीते, राग, धुन इ. गोष्टी सदस्यांसमोर समोर सादर करण्याचा प्रयत्न करतील. अनुभवी सदस्य त्या संबंधी मार्गदर्शन करू शकतील. Audio/Video ची तंत्रे वापरून सुधारणा व धीटपणा त्यातून साधला जाईल.

२. रसिकांसाठी परिषदा - रसिकांनी संगीत अधिक रसिकतेने ऐकावे यासाठी तज्ज्ञांकडून मार्गदर्शनाची अपेक्षा आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली Workshops भरविण्यात येतील. राग, ताल व निरनिराळ्या गायन-वादन पद्धती यासंबंधी माहिती पुरवली जाईल. भावगीते, पोवाडे इत्यादि गानांसंबंधी माहिती मिळविण्याचा वा पुरविण्याचा प्रयत्न केला जाईल.

३. समूह गीते - युवक किंवा प्रौढ एकत्र येऊन समूह गीते तयार करू शकतील. त्यांचे मार्गदर्शन व समूह गीते मिळविण्याचा प्रयत्न करू..

४. वाद्यवृंद - गेली दोन तीन वर्ष हा उपक्रम सातत्याने चालू आहे. त्यात वाढ व्हावी ही इच्छा. बासरी, सतार, पेटी, तबला इ. वाद्ये सध्या आहेत. त्याव्यतिरिक्त वाद्ये वाजविणारे कलाकार मिळाल्यास अधिक आनंद होईल.

संगीत विभाग सर्वांसाठी आहे. हा self help Group आहे. प्रयत्न करणारे कलाकार व रसिकता वाढवून घेणारे रसिक हवेत ही अपेक्षा. त्याना शिकण्यासाठी येथे क्लासेस नाहीत. त्यासाठी त्यांनी अन्य ठिकाणी जावे. अनुभवी सदस्यांचे मार्गदर्शन व प्रेक्षकांपुढे कार्यक्रम सादर करण्याची सवय या विभागात मिळेल. "God helps them who help themselves." या उक्तीनुसार आपल्या प्रगतीसाठी व त्यातून मिळणाऱ्या आनंदासाठी आपण या उपक्रमात भाग घ्यावा ही कल्पना.



संपर्कः डॉ. दामोदर गोडसे,
फोन 479-7182.

## हे एक लक्षात ठेवाल का?

ह्यापुढे होणाऱ्या मंडळाच्या कार्यक्रमांना बाल-संगोपनाची व्यवस्था असल्यास त्याचा जरूर फायदा घ्या. सोय नसेल किंवा असूनही तुमची मुले बालसंगोपकांकडे जाणार नसतील तर मुलांवर स्वतः जातीने लक्ष द्या. मुलांच्या गडबड-दंग्याने भविष्यात आपल्याला हॉल न मिळण्याची शक्यता निर्माण होते याची कृपया नोंद घ्या.

सूचनेबद्दल कृपया गैरसमजूत करून घेऊ नये. सभासदांची उपस्थितीच कार्यक्रम यशस्वी होण्यास मदत करते यात शंका नाही. आपल्या सहकार्याबद्दल आगाऊ आभार व्यक्त करीत आहोत.

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

**हरवले ते गवसेल काय?**

लाल मखमलीवर सोनेरी अक्षरातील मंडळाचा नामफलक आवराआवरीत गहाळ झाला आहे. कोणाला ठावठिकाणा असेल तर कळवणार काय?

**संपर्क :** भास्कर पावगी 447-7379

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

**मराठी शिक्षकांना आवाहन**

नॉर्थयॉर्क व पील स्कूल बोर्डातर्फे चालविल्या जाणाऱ्या मराठी- शिक्षणाच्या वर्गांना शिकविण्यासाठी मराठी शिक्षकांची जरूरी आहे. ज्यांना शिकविण्याची आवड व इच्छा आहे व महाराष्ट्रात शिकवल्याचा अनुभव आहे त्यांनी आपली नांवे कृपया १५ ऑगस्टपर्यंत द्यावीत.

**संपर्क:** माधव खांडेकर - 940-0105
अर्चना बापट - 226-1350

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

**प्रशस्तीपत्रक**

मंडळाच्या कार्यक्रमांना मदत करणाऱ्या युवक/युवतींना प्रशस्तीपत्रक देण्याची कल्पना नक्की झाली आहे. अशा तऱ्हेचे व्हॉलंटरी काम केलेले असणाऱ्या विद्यार्थीवर्गाला पुढे युनिव्हर्सिटीत प्रवेश घेतांना ह्या प्रशस्तीपत्रकाच्या पुस्तीची मदत होते याची जाणीव तुम्हाला आहेच. युवावर्गाच्या मदतीशिवाय मंडळाचा कार्यक्रम होऊ शकत नाही. तेव्हां बहुसंख्येने पुढे येऊन मदत करत रहा.

(पृष्ठ १ वरून पुढे...)

स्वयंसेवी मंडळांकडून अमूल्य देखभाल होते त्याचा काहीसा अवमान झाला... असो! तबल्यावर अजय धोंगडे आणि हार्मोनियमवर सचिन जांभेकर ह्या महाराष्ट्रातल्या सध्याच्या दोन आघाडीच्या तरुण कलावंतांनी जी उत्कृष्ट आणि रंगून साथ दिली त्याचा आस्वाद मात्र श्रोत्यांनी भरपूर लुटला. जुन्या आठवणी गुणगुणत प्रसन्न चित्ताने प्रेक्षक घरी गेले.

सौ. दुर्गा पाच्छापूरकर

---

## शोक समाचार

आपल्या मंडळाचे सदस्य **फत्तेसिंह चव्हाण** यांचे ९ एप्रिल १९९३ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मिक निधन झाले. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात मराठी भाषिक मंडळ सहभागी आहे.

## 'EVERYDAY COOKING'

वनिता सहाय्यक समितीने पूर्वी प्रसिद्ध केलेल्या 'EVERYDAY COOKING' ह्या पुस्तकाच्या प्रती उपलब्ध आहेत. त्याची किंमत $ ६.५० असून संपर्कासाठी **सौ. उमा दाते : ७४१.५४८९** यांना फोन करा.

---

## FOOD DRIVE

यंदाच्या वर्षी होणाऱ्या मराठी मंडळाच्या कार्यक्रमांचे वेळी FOOD BANK साठी मॅकरोनी, खाद्यपदार्थांचे टिन्स, पीनट बटर अशा तऱ्हेचे खाद्यप्रकार जमविण्याचा उपक्रम चालूच रहाणार आहे. कार्यक्रमांना आठवणीने काही घेऊन आल्यास जमा करून फूड बँककडे पाठविण्याची सोय मंडळातर्फे केली जाईल. आपण ह्या समाजात रहातो त्याचेही काही ऋण अंशतः फेडण्याच्या स्तुत्य उपक्रमाला जास्तीतजास्त लोकांनी हातभार लावावा ही विनंती.


# SONALI'S

***IF IT IS SAREES...***



1415 Gerrard St. E.
Toronto, Ontario
(416) 466 2001

181 Main St. W.
Hamilton, Ontario
(416) 527 3707

62 Wylie Ave.
Ottawa, Ontario
(613) 721 0318

# HOW TO SECURE YOUR
# *FINANCIAL FUTURE*

Strategy 2000, a free computerized, personal financial analysis, helps you identify your financial and life insurance needs, and shows you how to meet them. To learn more about Strategy 2000 call me today.

**Prakash Joshi, B. Comm.**
Life Underwriter

Toronto University Branch
Box 30, 300 - 438 University Ave
Toronto, ON M5G 2K8

Bus: 598-1779
Fax: 598-4832
Res: 855-2920

**SunLife**
*The Strength of the Sun is Yours*



**NEW BEGINNER YOGA CLASSES**
**ASANAS, BREATHING, RELAXATION**

**PLACE:** Oriole Community Centre on Don Mills between Sheppard and Finch

**STARTING DATE:** September 26, 1993
10 Classes

**TIME:** 10 AM TO 11:30 AM



**AGE:** 12 and up

To celebrate the 100th anniversary of the introduction of yoga in North America by Swami Vivekananda, the Marathi Bhashik Mandal gives you an opportunity to learn this ancient Indian spiritual discipline.

**Contact:** Shashi Karandikar
Certified Yoga Teacher
Tel. 820-2817
Mississauga



*We are Specialized in East & West Indian Groceries.*

**KENNEDY**
**FOODS & CATERING LTD.**

- Specialized in Vegetarian & Non vegetarian Catering
- Wholesaler & Retailer of Indian Sweets.

5 RESEARCH ROAD, BRAMPTON ONT. L6W 1P4
TEL: (416) 451-4111

**PLASTIC SPOONS** $1.99 50's

Dehradun **BASMATI RICE** $7.99 5kg. bag

**MILK** Homo or 2% $2.99

Punjab **CORN FLOUR** $6.99 8 lb. bag

**PARTY TRAYS** 6 compartments (white) $1.99 20's

**CORN OIL** $3.89 3 litres

**SAMOSAS** 4/$1.00

**SWEETS** $3.99 lb. Bulk order $2.99

**WE DO CATERING FOR WEDDING & BIRTHDAY PARTIES...**

- TANDOORI CHICKEN
- CHICKEN CURRY OR
- GOAT CURRY
- 2 VEGETABLES
- NAN
- DAAL
- RICE PILAV
- RAITA
- SWEET DISH
- SALAD

$ 3.99/PERSON



# श्रीगणेशपूजा

**दिनांक** : शनिवार २५ सप्टेंबर १९९३
**वेळ** : दुपारी १२ ते सायंकाळी ८
**स्थळ** : DOWNSVIEW SECONDARY SCHOOL
NORTH YORK, ONTARIO

**कार्यक्रमस्थळाचा नकाशा**




**कार्यक्रम:**

| | |
|---|---|
| १२ ते १ | नांवनोंदणी व श्रीगणेशपूजा |
| १ ते २ | आरती व दर्शन (आरती बरोबर १ वाजता सुरु होईल.) |
| २ ते ३ | अल्पोपहार व प्रसाद |
| ३ ते ७ | "आनंदीगोपाळ" तीन अंकी नाटक |
| ७ ते ८ | विसर्जन व नंतरची आवराआवर |

**'महाराष्ट्र मंडळ, न्यूयॉर्क' सादर करीत आहेत, श्री. राम जोगळेकर लिखीत श्री. ज. जोशी यांच्या सुप्रसिद्ध कादंबरीवर आधारित तीन अंकी सामाजिक नाटक**

# "आनंदी गोपाळ"

**प्रवेशमूल्य :**

सभासद (१९९३), युवा व प्रौढ ⟶ $ ९.००
१२ वर्षाखालील मुले आणि व्हिजिटिंग सीनीयर्स ⟶ $ ५.००
पाहुणे (नॉन मेंबर्स) ⟶ $ १२.००

**● खालील काही महत्वाच्या सूचना कृपया ध्यानात ठेवा ही विनंती ! ●**

१) मुलांसाठी GYM उपलब्ध आहे. GYM SHOES मात्र आठवणीने बरोबर आणावेत.

२) १२ वर्षाखालील मुलांना, नाटक सुरु असतांना सभागृहात प्रवेश दिला जाणार नाही.

३) बेबीसिटिंगची सोय केलेली आहे. MOVIE चीही व्यवस्था आहे. ह्या सोयीचा जरूर फायदा घ्यावा.

४) आरती व नाटकाची सुरवात, जाहीर केलेल्या वेळेवर सुरु करण्यासाठी आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे!



## राजकीय क्षेत्रात पुढचे पाऊल

येत्या केंद्रीय निवडणुकीत न्यू डेमॉक्रॅटिक पक्षाने **डॉ. उदयन रेगे** यांना 'इटोबिको सेंटर' ह्या केंद्रामधून आपले उमेदवार म्हणून घोषित केले आहे! ही गोष्ट आपल्या मराठी समाजाला भूषणावह आहे हे निश्चित. पार्लमेंटमध्ये पहिली भारतीय व्यक्ती निवडून येण्यासाठी सर्व मराठी बांधवांनी सक्रीय मदत करा.

**संपर्क:** (416)234-1741

## विशेष उल्लेखनीय !

आपल्या मंडळाच्या एक सदस्या सौ. मूर्ती यांचे पती श्री. गंडीकोटा मूर्ती यांना दीर्घकाळ केलेल्या समाजसेवेबद्दल केंद्रीय व प्रांतीय सरकारकडून, तसेच नॉर्थ यॉर्कचे मेयर मेल् लास्टमन यांचेकडून विशेष प्रशस्तीपत्रके मिळाली आहेत. मंडळातर्फे त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

************************************

## महिलांची सहल

महिलांसाठी सहल दरवर्षीप्रमाणे ठरली आहे. बहुसंख्येने येऊन मजा करा. हेच 'आग्रहाचे बोलावणे' समजून जरूर या. वेगळे फोन होणार नाहीत.

**दिवस** : १४ ऑगस्ट १९९३ शनिवार
**वेळ** : सकाळी १० ते .... !!?
**जागा** : शंऊडट्री मिल् पार्क - पिट् नंबर २
(नकाशा ह्याच अंकात आहे.)
**जेवण** : आपापल्या पसंतीचे आणायचे आहे. पेय वा पाणी जरूरीप्रमाणे आणा. चहा-कॉफी लागत असल्यास थर्मास भरून आणा. संध्याकाळचा उपहार तेथे पुरविला जाईल. त्याचा खर्च प्रत्येकी अदमासे २ ते ३॥ डॉलर्स येईल.

आपली नावे २० जुलैपर्यंत खालील महिलांना कळवा:
उमा दाते: ७४१-५४८१ आशा पत्की: २९३-6383
ज्योत्स्ना ओगले: 604-7580

## 'तरुण तुर्कांचे' आगेकूच

पंचविशीचा उंबरठा ओलांडलेली आपली तरुण पिढी आता व्यावसायिक क्षेत्रात कशी वाटचाल करते आहे याचा हाती असलेल्या माहितीवर आधारित एक छोटा आढावा!

- **उपेंद्र कावळे** डॉक्टर ऑफ ऑप्टॉमेट्री (वॉटर्लू युनिव्हर्सिटी)
- **वसंत पाच्छापूरकर** C.F.P. (सर्टिफाईड फायनान्सिअल प्लॅनर)
- **हेमंत टिळक** STIKEMAN ELLIOT BARRISTERS ह्या लॉ-फर्ममध्ये पार्टनरशिप.



- जयदीप मोरो M.D.
- हर्षद तेलंग M.D.
- इंद्रायणी तेलंग D.D.S.

## अभिनंदन !

कन्यारत्नाचे आगमनाबद्दल श्री. व सौ. एल्कन नौगांवकर यांचे अभिनंदन!
चि. अविवा - २५ फेब्रुवारी १९९३

## व्रतबंध

- चि. सुशील रत्नपारखी
- चि. पराग देसाई
- चि. योगेश ठाकूर

तिन्ही बटुंचे शुभाशिर्वादपूर्वक अभिनंदन!!



## आगामी कार्यक्रम

- सौ. रजनी जोशी यांच्या सुश्राव्य नाट्यगीत गायनाचा कार्यक्रम ११ जुलै, १९९३ सायंकाळी ३ वाजता -
  स्थळ यॉर्कवूड लायब्ररीचे सभागृह.

- सौ. निर्मला गोगटे यांच्या कार्यक्रमाविषयी निश्चित तारीख व स्थळ याबद्दल माहिती जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात उपलब्ध होईल.

– संपर्क: बाळ जोशी (४९५-७५२६)

************************************

For "Professional/Business Directory" Listing Information, Please Contact:

Mrs. Jyotsna Ogale
(416) 604-7580
OR
Mrs. Pravina Kale
(416) 793-8064

************************************

**For Mandal Correspondence, please contact:**

MARATHI BHASHIK MANDAL INC.
***c/o 10 Glamorgan Court***
***Unionville, Ontario. L3R 7V4***

# PROFESSIONAL/BUSINESS DIRECTORY

**Mr. Vinod Angadi**
*Income Tax and Accounting Consultant; Computerized Tax Returns*
5785 Yonge Street
Penthouse BH-405
Willowdale, Ontario
(416) 222-6831 (Phone or Fax)

•

**Dr. Girish Hattay** *Dentist*
701 Rossland Road East, Suite 207
Whitby, Ontario. L1N 8Y9
(416) 666-0244 (Bus.)

•

**Mr. Srikrisna Joshi**
*Jack's Electrical/Electronic Services*
145 Angus Drive,
Willowdale, Ontario.
(416) 496-6278 (Bus.)

•

**Mr. Sharad Katakkar** *Consulting Engineer*
Residential & commercial design; renovations; foundation problems; additions, etc.
(416) 479-2096 (Bus); (416) 479-4632 (Res)

•

**Mr. Ajit Kukade**
*Academy of Defensive Driving*
868 Markham Road, Suite 103
Scarborough, Ontario.
(416) 293-0786 (Bus.)

•

**Mr. Sameer Kulkarni**
*Computer Consultant; AUTOCAD 10,11,12 Training.*
(416) 823-7992; (416) 375-5753 (Pager)

•

**Dr. V.J. Kulkarni** *Family Physician*
40 Wellesley Street East, Suite 203
Toronto, Ontario. M4Y 1G4
(416) 920-2120 (Bus.)

•

**Mr. Vasant Pachapurkar** *Financial Planner*
304 The East Mall, Suite 604
Islington, Ontario. M9B 6E2
(416) 236-2564 (Bus.)

•

**Mr. Sada Sane** *Architectural & Urban Planning Consultant & Advisor to the Sign Industry*
(416) 445-5361 (Res.)

•

**Dr. Nita Tilak** *Dentist*
10 Gateway Boulevard, Suite R-175
Don Mills, Ontario. M3C 3A1
(416) 421-5110 (Bus.)



PLEASE CONTACT: बीना रेळे

# One place you'll never be with an ABEL system.

When the vendor of your computer system can't provide support ...or isn't even around to offer condolences... you're out on a limb. With no system updates. No expansion opportunities. And no future for your investment.

It also means you're not a customer of ABEL Computers Ltd.

At ABEL, we've entered our second decade of providing computer systems for practices like yours. We create the programs. Install the hardware. Conduct the training sessions. And are available 24 hours daily to serve you and your staff.

Another example of our quality service: We are an IBM Business Partner and we use IBM Personal System/2 hardware, the most advanced business computers available.

If you're about to choose a computer for your practice, start by checking the performance record of the system vendor against ours. You'll discover no one has a better reputation for service and support than ABEL.

Already have a computer? If it's an "orphan" system, or you're unsatisfied with the performance, call us now. We'll assess your situation and make it easy to convert to a more efficient and reliable ABEL system **using your current patient data.**

With the assurance of ABEL service, you'll soon have your feet back on the ground again.

ABEL

**ABEL COMPUTERS LTD.**
**MEDICAL & DENTAL COMPUTER SYSTEMS**

Offices in U.S.A. & Canada. Toll Free 1-800-263-5104.

IBM Business Partner
Authorized Advanced Products Dealer